**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १०३/२०१८** | **दिनांक २४/१२/२०१८** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १८/१२/२०१८ ते २४/१२/२०१८) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २५/१२/२०१८ सकाळी ८:३० पासून २९/१२/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८/१२ | १९/१२ | २०/१२ | २१/१२ | २२/१२ | २३/१२ | २४/१२ | | २५/१२ | २६/१२ | २७/१२ | २८/१२ | २९/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | ३०.० | ३०.० | ३०.२ | ३२.० | ३२.० | ३४.० | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३ | ३२ | ३३ | ३४ |
| १२.५ | ११.० | ९.४ | १०.० | १३.० | १५.० | १६.२ | **किमान तापमान (अं.से)** | २० | १९ | १८ | १९ | २० |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | २ | ३ | २ | ४ | ४ |
| ९० | ९० | ८७ | ९० | ८६ | ८९ | ९० | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ७२ | ७२ | ७३ | ७३ | ७१ |
| ७१ | ७८ | ७९ | ५८ | ५३ | ६० | ६६ | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६७ | ६८ | ६९ | ६९ | ७० |
| १.२ | १.२ | ०.७ | १.५ | १.१ | ०.९ | ०.७ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ५ | ७ | ९ | १० |
| प. | प. | प. | प. | प. | प. | प. | **वाऱ्याची दिशा** | ई. पू. | ई. पू. | ई. पू. | ई. पू. | ई. पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३०७१.८ | ३६३३.५ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २५ ते २९ डिसेंबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील. दिनांक २५ ते २९ डिसेंबर २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ५ ते १० कि. मी. प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | उगवण | • भात रोपवाटीकेस योग्य त्या प्रमाणात पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| वाल | शाखीय वाढीची अवस्था | • वाल पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास रोगाच्या नियंत्रणासाठी पिकावर ०.२ टक्के मॅन्कोझेब २० ग्रॅम किंवा ०.२ टक्के कॉपर ओक्झीक्लोराईड २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून रोगाच्या तीव्रतेनुसार दर १५ दिवसांनी फवारणी करावी. |
| आंबा | पालवी आणि बोंगे फुटण्याची अवस्था | • आंबा पिकामध्ये बोंगे फुटण्याच्या अवस्थेत तुडतुडयाच्या नियंत्रणासाठी प्रवाही लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या खोडावर, फांद्यावर व पानांवर बसेल अशारीतीने संपूर्ण झाडावर फवारणी करावी. तसेच भुरी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या फवारणीच्या द्रावणामध्ये ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक प्रति लिटर २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात मिसळावे.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे. |
| काजू | मोहोर अवस्था | • काजूमध्ये मोहोर फुटण्याच्या अवस्थेत ढेकण्याचा (टी मॉस्कीटो बग) आणि फुलकिडीच्या नियंत्रणासाठी प्रवाही प्रोफेनोफोस ५० टक्के १० मि. ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून मोहोर फुटण्याच्यावेळी फवारणी करावी.(सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे.<br>• काजू बियांचे उत्पादन व बियांचे आकारमान वाढविण्यासाठी प्रति झाड ताज्या किंवा आठ दिवसापर्यंत साठविलेल्या २५ टक्के गोमुत्राची फवारणी (५ लिटर द्रावण) आणि २५ टक्के गोमुत्राची झाडाच्या बुंध्यामध्ये जिरवणी (१० लिटर द्रावण) ऑक्टोबर महिन्यापासून दर महिन्याला एक अशी चार महिने करावी. |
| नारळ | - | • नारळबागेत पानांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.<br>• नारळ बागेत ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| मसाले पिके | फलधारणा | • काळीमिरी बागेत वेलाभोवती आवशक्यतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | वाढीची अवस्था | • भाजीपाला पिकास नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी ५० किलो नत्र (१०८ किलो युरिया) या प्रमाणात पिक लागवडीनंतर १ महिन्याचे झाले असल्यास देण्यात यावा.<br>• टोमॅटो, वांगी, मिरची पिकावर पाने खाणारी अळी, तुडतुडे, मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २० मिली किंवा डायमेथोएट १५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून १०-१५ पावसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• टोमेटो पिकास काठीचा आधार दयावा.<br>• भाजीपाला पिकास ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी कोमट व स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**